प्रकरण ५

## पूर्वरूप विचार

पूर्वरूपं येन लक्ष्यते ....

उत्पित्सुरामयो दोषविशेषेणानधिष्ठितः ।
लिंगमव्यक्तमल्पत्वात् व्याधीनां तत् यथायथम ।

माधवनिदानकारांनी विशेष प्रकारची दोषव्यक्ति होत नाही. परंतु उत्पन्न होणाऱ्या व्याधींची लक्षणें अल्पत्वाने व अव्यक्ततेने व्यक्त होणारी अवस्था म्हणजे पूर्वरूप अशी वरीलप्रमाणे पूर्वरूपाची व्याख्या केलेली आहे.

पराशरादि टीकाकारांनी पूर्वरूपानें दोषविशेष प्रकट होत नाहींत असें स्पष्ट म्हटलें आहे. पूर्वरूपं नाम येन माविव्याधिविशेषः लक्ष्यते न तु दोषविशेषः ।

सुश्रुतानें सामान्य व विशेष असे पूर्वरूपाचे दोन स्वतंत्र भाग पाडून विशिष्ट पूर्वरूपानें दोषविशेष ज्ञात होतात असें प्रतिपादन केलें आहे. उदा. अतिजृंभा वात .... तसेंच पूर्वरूपाचें सामान्य लक्षण म्हणून "स्थान — संश्रयावस्थेंत दोष असणें" आवश्यक असते. चयामध्ये दोष व्यक्त होत असतात. प्रकोपामध्येंही दोषांना व्यक्तत्व असतें. तसेंच प्रसारावस्थेतील प्रत्येक व्याधींची दोषात्मक लक्षणें वर्णन करतां येतात. त्यानंतर व्यावस्थेत अर्थात व्याधी व्यक्तीच्या कालामध्ये अनुक्रमे वाताची, पित्ताची व कफाची लक्षणे भेदरूपाने स्पष्ट करतां येतात. सुश्रुतानें संचयावस्थेत प्रथम क्रियाकाल, त्याचप्रमाणे प्रकोप, प्रसर व स्थानसंश्रय या अवस्थेत दोषांवरचे क्रियाकाल वर्णिले आहेत. ते ते क्रियाकाल टाळले तर उत्तरोत्तर अवस्थेमध्ये दोष अधिकाधिक बलवत्तर होत जातात." संचये पहता दोषाः लभन्ते नोतरा गति .... ।" यावरून स्थानसंश्रय झाल्यानंतर पूर्वरूपांतील दोषही व्यक्त होतात. वाग्भटाचा

टीकाकार अरुणदत्त याने ३ प्रकारच्या पूर्वरूपांचे वर्णन केलें आहे. १] शारीर २] मानस ३] शारीर - मानस ....प्राग्रूपं त्रिधा दृश्यते किंचिच्छारीर .... मानसं .... किंचित शारीरमानसं ...[वा.नि.१] टीका.

वरील व्याख्यांमध्ये रोगसंप्राप्तींत जिला अग्रेसरत्व देता येईल अशी पूर्वरूपाची खालील व्याख्या वर्णिली आहे.

भाविव्याधिबोधक दोषदूष्यसंमूर्च्छना, ही संप्राप्तीच्या याच पूर्वरूपाच्या अवस्थेत स्पष्ट दिसते.

त्रिदोषांचा त्वंङमांसांतर स्थानसंश्रय झाल्यानंतर उदराची पूर्व - रूपे व्यक्त होतात. सामान्यत: रोगव्यक्ति झाल्यानंतर रुग्णालयांत रुग्ण प्रविष्ट होत असल्यानें व पूर्वरूपेंच पुढे व्यक्तावस्थेत येत असल्याकारणानें अंदाज होत असल्यानें व पूर्वरूपेच करता येतो. परंतु विशिष्ट पूर्वरूपांतील निदानांवरून इतिहासातील दोष - विशेष अजमावंता येतो. कांही वेळां शोथ असतां उदराततत्व, मलमूत्रसंग वगैरे लक्षणें होउ लागतांच रुग्णाला पुढील भयंकर व्याधीची कल्पना देउन अगोदरच पथ्यानें रहावयास सांगून व्याधिसंप्राप्तीची व्यक्ति टाळता येते.

पूर्वेतिहासांत रोगाचा क्रम बरोबर कळला तर चिकित्सा त्यानुराधाने बरोबर करतां येते. यासाठी उदर पूर्वरूपे जाणून घेणे अत्यावश्यक आहे. रुग्णाला केवळ प्रश्न विचारूनच आपण पूर्वरूपे जाणूं शकतों. अधिकांश रुग्ण अशिक्षित असल्यानें पूर्वरूपांचे ज्ञापकतेंने विवरण करण्यास समर्थ नसतांत. बहुतेक रोगी पोटांत पाणी झाल्यावरच येतात. यातील पूर्वरूपे प्राय: साधारण असल्याकारणाने शिक्षित व्यक्तीही त्याकडे लक्ष

---

स्थानसंश्रयिण: कृध्द: भाविव्याधिप्रबोधकम्‌ ।
दोषा: कुर्वन्ति यं लिंगं पर्वरूपं तदुच्यते ।।

देत नाहींत व चिकित्सकांकडे येत नाहींत.

क्षुन्नाशः स्वाद्वति स्निग्धं गुर्वन्नम पच्यते चिरात् ।
भुक्तं विदह्यते सर्वं. सर्व जीर्णाजीर्णं न वेत्ति च ।
सहते नाति सौहित्यमीषच्छोफश्च पादयोः ।
शश्वद्बलक्षयो ल्पेपि व्यायामे श्वासमृच्छति ।
वृध्दि पुरीषनिचयो रुक्षोदावर्तहेतुका ।
बस्ति संधौरुग्णाध्यानं वर्धते पाटयते पि च ।
आतन्यते च जठरमी पि लध्वल्पभोजनात् ।
राजीजन्म क्लीनाश इति लिगं भाविश्यताम । च. चि. १३/१६-२१
तत्पूर्वरुपं क्लवर्णकांक्षा । बलीविनाशो जठरे हि राज्यः
जीर्णा परिज्ञान विदाहवत्यो । बस्तौ रुजः पादगतश्च शोफ
सु. नि. ७/७
भाविनस्तस्य लक्षणम् ।
क्षुन्नाशो ऽन्न चिरात्सर्व सविदाहं च पच्यते ।
जीर्णाजीर्णं न जानाति सौहित्यं सहते न च ।
क्षीयते बलत: शश्वत श्वसित्यल्पे सहते न-च पि चेष्टिते ।
वृध्दिर्विशो प्रवृत्तिश्च किंचित शोफश्च पादयोः ।
रुग्बस्तिसंधौ ततता लध्वल्पा भोजनैरपि ।
राजीजन्म क्लनाशो जठरे ... । वा. नि. १२/९

वर वर्णन केलेली पूर्वरुपेंच स्मावस्थेत अधिक व्यक्त होत असतात. उदरव्यक्तीच्या पूर्वी वर्णित कांही लक्षणे इतर रोगांतही असतात. जसे वृक्कजन्य विकारांत बस्तीमध्ये दाहयुक्त वेदना, हृज्जन्य विकारांत पादशोथ तथा अल्प परिश्रमानें श्वासकच्छता, यकृतजन्य विकारांत क्षुधानाश, निरंतर बलक्षीणता वगैरे उदराची पूर्वरुपें सर्व प्रकारच्या उदर रोगांत होणाऱ्या पूर्वरुपांचा संग्रह आहे. ही पूर्वरुपे दोषज उदर व्याधींना

अनुलक्षून आहेत. बध्द गुदोदर, छिद्रोदर यांना अनुलक्षून नाहींत. कारण ही शल्यक्रिया साध्य अशीं उदरें आशुकारी असतात, दोषज उदर व्याधी प्रमाणें चिरकालिका नसतात. म्हणून पूर्वरुपें ही दोषज उदराची समजणे इष्ट आहे.

दोषांचा विकृत व्यापार [ संप्राप्ति ] सुरु होतांच पूर्वरुपांची निर्मिती होण्यास सुरुवात होते आणि लक्षणाचे समीक्षण करुन संप्राप्ति जाणून घ्यावी लागते. रोगी हा त्यास अनुभवास येणारीच लक्षणे सांगत असतो. पूर्वरुपांचा अन्वयार्थ करुन आपणांला ग्रंथांत दिलेल्या संप्राप्तिचा पडताळा पाहतां येतो.

१. क्षुन्नाश -- भूक न लागणे - उदर व्याधींत होणारे अग्नि मांधजनित असें हे चिन्ह व्यक्त होतें.

२. अन्नं चिरात् पच्यते .... अन्न अधिक वेळाने पचते.

३. सविदाह पच्यते ... विदाह होत पचते.

४. जीर्णाजीर्णं न जानाति ... जिरलें वा न जिरलें हें कळत नाहीं... जिरण्याचे स्वास्थ नाहीं.

५. सौहित्यं सहते न च । ... पोट भरुन जेवणे सहन होत नाहीं.

वरील लक्षणें अग्निमांध निदर्शक आहेत.

६. क्षीयते बलत: ... गात्रावसाद मनुष्याची कर्तृत्वशक्ती कमी होणे. हे [ लक्षण ] अग्निमांधामुळे झालेल्या अपतर्पणाचें व अल्पप्राणतेचें लक्षणे आहे.

७. श्वासिति अल्पे पि चेष्टिते ... प्राणक्षयाचें लक्षण आहे.

८. वृध्दि -- उदरवृध्दि हाच अर्थ येथे अभिप्रेत आहें. ही आध्मान. प्रध्मात कुक्षय: यांनी शास्त्राकारांनी व्यक्त केलेली आहे.उदर रोग असल्यामुळे यकृतवृध्दि प्लीहावृध्दि, जलोदर यांनी उदराचे आकारमानांत वाढ होईल.

९. विष्टंभ: अप्रवृत्ति ... अपानाची प्रतिलोमता झाल्याने निर्माण होते.

१०. पादशोफ .... उदरांचे संप्राप्तींत अब्धातु त्वग्गत झाल्यानें अपानदुष्टींचे हें चिन्ह आहे.

११. बस्तिसंधी रुक .... मूत्रप्रवृत्ति प्रकृत न झाल्यानें बस्तीचे ठिकाणीं वेदना होतात. अपानाची प्रतिलोमतानिदर्शक हें चिन्ह आहे.

१२. लघ्वल्पाऽभोजनै: अपि ततता --- हलका आहार घेतला, मुळींच आहार घेतला नाहीं तरी पोट ताठलेलेंच वाटतें. अग्निमांद्य व अपानाची प्रतिलोमता निदर्शक हें लक्षण आहे. उदरगत अवयवाच्या वृध्दिमुळेंही हें लक्षण निर्माण होतें. अर्थातच अवयवांची वृध्दि योग्य प्रयत्नाने जाणून घेतां येतें.

१३. राजीजन्म .... पोटावर निळ्या किंवा तांबड्या रेषा निर्माण होणे, विशेषत: यकृद्दाल्युदरांत व यकृत वृध्दिजन्य जलोदरांत हे लक्षण निर्माण होतें. रक्तवह स्त्रोतसांत व अवरोध झाल्यामुळे त्वग्गत रक्तवाहिन्याच राजीस्वरुप धारण करतात. विशेषत: पोटावर क्वचित छातीवर देखील ह्या राजी दिसतात.

१४. वलीनाश .... पोटावर ज्या निसर्गत: वळ्या असतात त्या नाहींशा होऊन पोटाला ताठरपणा आणि तुकतुकीतपणा येतो. साधारणत: बेंबीचे खाली जो खळगा असतो तो सुध्दां नाहींसा होतो.

१५. बलवर्णाकांक्षा ... आपण कसे दिसतो [वर्ण कसा आहे] बल, शक्ति, कितपत आहे हें जाणून घेण्याची इच्छा होणें, क्षय रोगांत देखील हें मानसिक लक्षण आढळते व त्यास त्यांचे शरीर गेलेले आहे याची आंतरिक जाणीव झालेली असते व त्यामुळे आपण चांगले दिसावें, बलवान असावें, अशी त्यास इच्छा उत्पन्न होते.

ह्या सर्व पूर्वरूपांचा विचार केला तर कायाग्निची मंदता प्रामुख्याने असते हे सुस्पष्टच आहे. [ १ ते ६, १२ ] अपानाची प्रतिलोमता आढळून येते [ ९, १०, ११, १२ ] प्राणाच्या प्रतिलोमगतीची किंवा अवरोधाची लक्षणे अगदींच अल्प [७] आहेत.

याचा अर्थ असा कीं उदर रोगाच्या प्रारंभीच्या अवस्थेत प्राण - वायूची विकृति फारशी नसते. अग्निमांद्यामुळे, शरीराच्या होणाऱ्या कुपोषणामुळें होणारी आनुषंगिक लक्षणेंही [६,४] बरीच आहेत. उदर रोगाचें पूर्वरूपातंच रोगी बराच बलक्षीण झालेला असतो. त्यामुळे "बला" च्या अभावी हा विकार बहुधा असाध्यत्व पावतो. स्त्रोतोरोधा ...... नें शोफ सुरवातीपासून असतो.

बाकींची लक्षणे आनुषंगिक असून, बलवर्णकांक्षा हें लक्षण मानसिक स्थितीचे सूचक आहे.

उदर विकाराच्या पूर्वरूपांचा विचार केला.

उदर रोग्यांतील पूर्वरूपांचे प्रत्यक्षांत वर्णन पुढे दिले आहे ....

१०० उदर रोग्यांतील पूर्वरूपांचे प्रत्यक्षांत वर्णन.

| | पूर्वरूप | रुग्णसंख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १. | क्षुधानाश | | ८५ |
| २. | बलक्षय | | ६५ |
| ३. | सम्यक् न पच्यते | | ६२ |
| ४. | पुरीष अप्रवृत्ति | | ४९ |
| ५. | आध्मान | | ३६ |
| ६. | मुखवैरस्य | | ३४ |
| ७. | उदर वेदना | | ३१ |
| ८. | श्वासकृच्छ्रता | | ६ |
| ९. | पादशोथ | | ३ |
| १०. | राजीजन्म | | १ |
| ११. | बस्तिसंधी दाह | | १ |




१०० उदरी रुग्णांतील पूर्वरूपांचे प्रत्यक्षांत विवरण